सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.जिकाठा/जि.आ.नि.कक्ष/कोरोना/प्रतिबंधित क्षेत्र/२० दि.१९/०४/२०२०

**वाचले :-**

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.कोरोना/ २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दिनांक १४/०३/२०२०.
४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन लॉकडाऊन अधिसूचना क्र. डिएमयू/२०२०/प्र.क्र.९२ दि.२३/०३/२०२०
५) केंद्र शासनाकडील अधिसूचना क्र. (MHA)/Order No.40-3/2020-DM-I (A) दि. २४/३/२०२०
६) केंद्र शासनाकडील अधिसूचना क्र. (MHA)/Order No.40-3/2020-DM-I (A) दि.१५/०४/२०२०
७) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन लॉकडाऊन सुधारित आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि.१७/०४/२०२०

---

**आदेश:-**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

साथ रोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ हा ठाणे जिल्ह्याच्या संपुर्ण क्षेत्रासाठी लागू करण्यात आलेला आहे. तसेच उपोदघातातील अ. क्रं. ३ अन्वये राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

उपोदघातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांना ठाणे जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियत्रंण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियम १० अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहेत.

कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपत्कालिन उपाययोजनेचा भाग म्हणून उपोद्घातातील अ.क्र.४ व ५ अन्वये राज्य शासनाने व केंद्र शासनाने लॉकडाऊन उद्घोषणेद्वारे नागरिकांची गर्दी होऊ नये आणि परस्पर संपर्क वाढून विषाणूचा संसर्ग वाढू नये, यासाठी संपूर्ण देशभरात मार्गदर्शक सूचना, आदेश लागु केले आहेत. सदरच्या लॉकडाऊन आदेशांना उपोद्घातातील अ.क्र.६ व ७ अन्वये दि.०३/०५/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.



ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

Scanned with CamScanner

तसेच उपोद्घातातील अ.क्र.६ व ७ अन्वये कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी नमूद दि.१७/४/२०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार एकत्रीत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदरच्या सूचनांमध्ये नमूद निवडक बाबींसाठी दि.२०/०४/२०२० पासून विशिष्ट अटी व शर्तीवर सूट देण्यात आलेली आहे. तथापि, परिच्छेद क्र.३ (i) व (ii) नुसार प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) जाहीर करणेचे आहेत आणि अशा प्रतिबंधित क्षेत्रात ही सूट लागु असणार नाही. तसेच ज्या परिसरात नव्याने कोव्हीड-१९ चे बाधित रूग्ण आढळून येतील, त्या भागांत अशी सूट तात्काळ बंद करण्यात येईल, असे निर्देशित करण्यात आले आहे.

ठाणे जिल्हयातील सर्व ६ महानगरपालिका, २ नगर परिषदा, २ नगरपंचायती तसेच ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषदेने आपापल्या कार्यक्षेत्रातील कोरोना प्रादुर्भावग्रस्त व्यक्तींची वाढती संख्या विचारात घेऊन प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) जाहीर करणेसाठी प्रस्ताव या कार्यालयास सादर केले आहेत.

याद्वारे उपोद्घातातील अ.क्र.७ दि.१७/०४/२०२० चे अधिसूचनेतील परिच्छेद क्र.३ (i) व (ii) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ठाणे जिल्हयातील खालील तपशीलाप्रमाणे क्षेत्र सीमांकित करून प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) म्हणून जाहीर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **महानगरपालिका/नगरपरिषद/जिल्हा परिषद** | **प्रतिबंधित करण्यात आलेले क्षेत्र (Containment Zone)** |
|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका | ठाणे महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| २ | नवी मुंबई महानगरपालिका | नवी मुंबई महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| ४ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका | कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| ५ | उल्हासनगर महानगरपालिका | उल्हासनगर महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| ६ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्र |
| ७ | अंबरनाथ नगरपरिषद | अंबरनाथ नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र |
| ८ | कुळगांव-बदलापूर नगरपरिषद | कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र |
| ९ | शहापूर नगरपंचायत | शहापूर नगरपंचायतीचे संपूर्ण क्षेत्र |
| १० | मुरबाड नगरपंचायत | मुरबाड नगरपंचायतीचे संपूर्ण क्षेत्र |
| ११ | ठाणे जिल्हा (ग्रामीण) | ठाणे जिल्हा परिषदेचे संपूर्ण क्षेत्र |

उपरोक्त प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) दि.१७/०४/२०२० रोजीच्या शासन लॉकडाऊन आदेशामध्ये नमूद केलेल्या सवलती लागु राहणार नाहीत व या बाबींवर सद्यस्थितीत अंमलात असलेले प्रतिबंध लागु राहतील. सदरच्या प्रतिबंधात्मक सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची सर्व संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी.



Scanned with CamScanner

सदरचे आदेश हे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधीतांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीतांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ व ५६, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, (४५ ऑफ १८६०) कलम १८८ नुसार दंडनीय/कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.१९/०४/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला असे.

**(राजेश ज. नार्वेकर)**
**जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे**

**i. प्रति लिपी माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
**ii. प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-**
१) मा.पोलीस आयुक्त ठाणे/नवी मुंबई
२) मा.आयुक्त, महानगरपालिका, ठाणे/नवी मुंबई/कल्याण डोंबिवली/मिरा-भाईंदर
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे
४) पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण)
५) आयुक्त, महानगरपालिका भिवंडी-निजामपूर/उल्हासनगर
६) सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग ठाणे
७) सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती (सर्व)
८) कामगार उपआयुक्त, ठाणे
९) उपविभागीय अधिकारी, ठाणे/कल्याण/भिवंडी/उल्हासनगर
१०) जिल्हा शल्य चिकीत्सक,ठाणे/जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.ठाणे
११) जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे/ उपनियंत्रक शिधा वाटप कार्यालय, ठाणे.
१२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे
१३) तहसीलदार (सर्व) / अपर तहसीलदार, मिरा-भाईंदर
१४) गटविकास अधिकारी, कल्याण/भिवंडी/अंबरनाथ/शहापूर/मुरबाड.
१५) मुख्याधिकारी,अंबरनाथ/कुळगांव-बदलापूर नगरपरिषद/शहापूर/मुरबाड नगर पंचायत
१६) जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे.



Scanned with CamScanner